अतिरिक्त महापालिका आयुक्त (जनरल)
यांचे कार्यालय,पुणे महानगरपालिका.
जा. क्र. अतिमआ(ज.)/एलओ/८८६
दिनांक :- २४/११/२०१५

## – कार्यालय परिपत्रक –

**विषय:**– भारतीय संविधान दिनानिमित्त भारतीय संविधान प्रास्ताविकेचे सामुहिक वाचनाबाबत.

भारतीय ''संविधान दिवस'' निमित्त भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचनाचा कार्यक्रम मा.महापौर, पुणे यांचे उपस्थितीत गुरूवार, दिनांक २६/११/२०१५ रोजी सकाळी ११.०० वाजता महापालिका भवन, हिरवळीवर आयोजित करण्यात आला आहे.

भारतीय संविधानाच्या कार्यक्रमासाठी सर्व अधिकारी व सेवकांनी उपस्थित राहणे आवश्यक आहे. ही बाब लक्षात घेवून, सर्व मा.खातेप्रमुख यांनी आपल्या नियंत्रणाखालील सर्व विभाग व उप विभागातील सेवकांना संविधान प्रास्ताविकेचे वाचनासाठी कार्यक्रमांचे किमान ५ मिनिटे अगोदर महापालिका भवनाचे हिरवळीवर उपस्थित राहण्याच्या सूचना द्याव्यात.

तसेच विभागीय कार्यालयांनी (परिमंडळ क्र १ ते ४) त्यांचे स्तरावर उपरोक्त दिवशी व वेळी भारतीय संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचनाचा कार्यक्रम आयोजित करावा.

(राजेंद्र जगताप)
अतिरिक्त महापालिका आयुक्त (ज.),
पुणे महानगरपालिका.

प्रत :
सर्व मा. खातेप्रमुख/महापालिका सहाय्यक आयुक्त/विभागप्रमुख,
पुणे महानगरपालिका
यांजकडेस माहिती व जरुर त्या कार्यवाहीसाठी रवाना......

D:\Revati\Constitution Day\2015\Addnl Note sign circular.doc

15

परिशिष्ट -१

# भारताचे संविधान

## उद्देशिका

आम्ही, भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम

समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडविण्याचा

व त्याच्या सर्व नागरिकास

सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय ;

विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रध्दा

व उपासना यांचे स्वातंत्र्यः

दर्जाची व संधीची समानता

निश्चितपणे प्राप्त करुन देण्याचा

आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा

व राष्ट्राची एकता आणि एकात्मता

यांचे आश्वासन देणारी बंधुता

प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करुन

आमच्या संविधानसभेत

आज दिनांक सव्वीस नोव्हेंबर, १९४९ रोजी

याव्दारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित

करुन स्वतःप्रत अर्पण करीत आहोत.

---